# वरिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे

जिमखाना विभाग
वार्षिक अहवाल
(२०१०-११)

---

- **जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धा, (चिपळूण) :** रोटरी क्लब ऑफ चिपळूण यांच्यावतीने १५ ऑगस्ट २०१० रोजी जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या ५ मुलं व ५ मुलींनी सहभाग घेतला होता. महिला गटात कु. गावडे दिपाली पांडूरंग हिने प्रथम व पुरूष गटात कु. साळुंखे विशाल विस्वास याने तृतीय क्रमांक पटकावला.

- **आंतर -महाविद्यालयीन क्रॉस कंट्री, (जे.एस.एम.कॉलेज अलिबाग)** : २९ ऑगस्ट २०१०रोजी जे.एस.एम.महाविद्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथे संपन्न झालेल्या आंतर - महाविद्यालयीन क्रॉस -कंट्री स्पर्धेत मुले व मुलींचा संघ सहभागी झाला होता. मुलींच्या संघाने सांघिक गटात **प्रथम** क्रमांक पटकावला. ६ मुलींना प्रत्येकी **सुवर्ण पदक**, प्रमाणपत्र, १० मार्क व महाविद्यालयासाठी चषक असे पुरस्काराचे स्वरूप आहे. महाविद्यालयाच्या इतिहासामध्ये सुवर्ण पदक मिळविण्याचा हा पहिलाच योग होय. कु. दिपाली पांडूरंग गावडे, गावडे वर्षा पांडूरंग, कदम मनिषा मनोहर, चव्हाण विशाखा दिपक, कदम धनश्री प्रकाश, शिर्के धनश्री महादेव या सुवर्ण पदकाच्या मानकरी ठरल्या. सदर स्पर्धेत मुलांच्या गटात महाविद्यालयाने ४था क्रमांक मिळविला. ९ विद्यार्थ्यांना या वर्षासाठी प्रत्येकी १० गुण मिळाले.

- **जिल्हास्तरीय मॅराथॉन स्पर्धा, (चिपळूण) :** २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रिय क्रिडा दिनानिमीत्त क्रिडा प्रबोधिनी आणि परशुराम एज्यूकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या खुल्या गटामध्ये महाविद्यालयाने सहभाग घेतला होता. या स्पर्धेत कु. ऋषिका पांडूरंग कदम हिने प्रथम क्रमांक पटकावला. रोख २००१, चषक व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

- **आंतरवर्गीय कॅरम स्पर्धा, (पाटपन्हाळे)** : महाविद्यालयामध्ये २९ ऑगस्ट या राष्ट्रिय क्रिडा दिनानिमीत्त महाविद्यालयीन स्तरावर कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुलांच्या गटात २४ तर मुलींच्या गटात ६ विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता. मुलांच्या गटात कु. आजिम साल्हे तर मुलींच्या गटात कु. शितल चव्हाण विजेते ठरले.

- **आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा, (वेगुर्ला)** : २७ सप्टेंबर २०१० रोजी बी.के. महाविद्यालय, वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदूर्ग येथे संपन्न झालेल्या अंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाने सहभाग घेतला होता.

- **वार्षिक क्रिडा स्पर्धा** : दि. २१ ते २३ डिसेंबर २०१० मध्ये महाविद्यालयाच्या वार्षिक क्रिडा स्पर्धा विद्यार्थ्यांच्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे उत्साहाने घेण्यात आल्या. कबड्डी, खो-खो, क्रिकेट या सांघिक स्पर्धांमध्ये सर्वच वर्गांनी सहभाग नोंदविला. धावणे, कॅरम, थाळीफेक, गोळाफेक या वैयक्तिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. याच वेळी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आंतर -महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा घेतल्या. त्यात महाविद्यालयाने सहभाग नोंदवला.

- **आंतरमहाविद्यालयीन कॅरम स्पर्धा, (मुबई)** : दि. ०९/०२/२०११ रोजी मुबई विद्यापिठाच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन कॅरम स्पर्धेत महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- **रायगड चढणे व उतरणे** : दि. १२/०२/२०११ रोजी रायगड येथे संपन्न झालेल्या आंतर - महाविद्यालयीन रायगड चढणे व उतरणे या स्पर्धेत महाविद्यालयाचा सहभाग होता. या स्पर्धेत मुलांच्या गटात ०९ व मुलींच्या गटात ०६ विद्यार्थीनींचा सहभाग घेतला होता. मुलींच्या गटामध्ये सांघिक गटामध्ये तिसरा क्रमांक मिळविला. याबदल ६ विद्यार्थीनींना प्रत्येकी **कास्य पदक** मिळाले. या बदद्ल प्रत्येक विद्यार्थीनींना विद्यापिठाकडून **१० ग्रेस मार्क्स** मिळाले.

२०१०-११ या वर्षात आंतर -महाविद्यालयीन स्तरावर १२ पदके, जिल्हास्तरावर ०३ पदके मिळवून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या नावलौकीकात मोलाची भर घातली.